## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ

विषय : इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गतच्या तज्ञ समितीची दि.८.१०.२०१३ रोजी दु. १.३० वा. संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत

दिनांक ८.१०.२०१३ रोजी दु. १.३० वाजता म. मंत्री (कामगार), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गतच्या तज्ञ समितीची बैठक पार पडली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. हसन मुश्रीफ | - | मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष, तज्ञ समिती |
| २. | श्री. राजेंद्र गावीत | - | मा.राज्यमंत्री (कामगार) तथा उपाध्यक्ष तज्ञ समिती |
| ३. | श्री. अरविंद कुमार | - | मा.प्रधान सचिव (कामगार), महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा सदस्य, तज्ञ समिती |
| ४. | श्री. मधुकर गायकवाड | - | मा.कामगार आयुक्त, मुंबई तथा सदस्य तज्ञ समिती |
| ५. | श्री. बाळासाहेब कोळसे | - | मा. सह सचिव (कामगार) |
| ६. | श्री. भू.मु.गुरव | - | मा.सह सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई तथा सदस्य तज्ञ समिती |
| ७. | श्री विलास मोरे | - | मा.संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय तथा सदस्य, तज्ञ समिती |
| ८. | श्री. दादाराव डोंगरे | - | मा. सदस्य, तज्ञ समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | श्री. अनिल द. ढवळे | - | मा. सदस्य, तज्ञ समिती |
| १०. | श्री. आसिफ उ. कासकर | - | मा. सदस्य, तज्ञ समिती |
| ११. | श्री. मुस्ताक अ. दळवी | - | मा. सदस्य, तज्ञ समिती |

सर्वप्रथम सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली.

मा.कामगार आयुक्त यांनी मागील बैठकीचे इतिवृत्त व सल्लागार समितीने सुचविलेले नियमातील बदल व मंडळाने तयार केलेले नवीन नियम सभासंदांपुढे मान्यतेकरिता सादर केले. त्यास सर्वांनी मान्यता दिली.

मा. अध्यक्ष तथा मा.मंत्री (कामगार) यांनी बांधकाम कामगारांची दिवाळी भेट देण्याबाबतची मागणी असल्याचे सांगितले. यावर मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी तशी योजना आखून भेट देता येईल असे मत व्यक्त केले. परंतु तसाच पायंडा पडेल असेही मत व्यक्त केले. श्री. डोंगरे व श्री.ढवळे यांनी दिवाळीसाठी बांधकाम कामगारांना भेट वस्तू द्यावी असे सुचविले. मा.अध्यक्षांनी याबाबतीत दिवाळीत भेट वस्तू देण्याबाबत विचारविनियम करावा असे सुचविले.

मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी घरबांधणी व घरदुरुस्तीच्या ज्या योजना तयार केलेल्या आहेत, त्याप्रमाणे कर्ज दिल्यास कर्जाच्या परतफेडीचा प्रश्न निर्माण होईल असे मत व्यक्त केले. मा.अध्यक्ष यांनी अनुदान देता येईल का अशी विचारणा केली असता मा.अध्यक्षांनी कायद्यात तशी तरतूद नसल्याचे निदर्शनास आणून दिले व बँकेमार्फत ही योजना राबविता येईल असे सुचविले. मा.अध्यक्षांनी बँकामार्फत कर्ज देण्याची बाब व्यवहारार्थ नसल्याचे स्पष्ट केले. श्री.डोंगरे यांनी अधिनियमाप्रमाणे कर्ज देता येते असे प्रतिपादन केले. यावर मा.अध्यक्ष महोदयांनी कर्जवसुलीचा प्रश्न असल्याचे नमूद केले. मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी त्यापेक्षा मंडळाचे वार्षिक आर्थिक उत्पन्न लक्षात घेवून वीज, पाणी इ. बाबतीत अनुदान देण्याबाबत विचार करावा असे सुचविले. मा.अध्यक्ष यांनी याबाबतीत मंडळाने अभ्यास करुन निर्णय घ्यावा असे सुचविले.

श्री. डोंगरे यांनी असे सांगितले की, लाभार्थी बांधकाम कामगाराच्या नोंदणीकरीता पूर्ण माहिती मिळत नसल्याने लाभार्थी अर्जाचा नमुना दिल्ली बोर्डाप्रमाणे करावा असे सांगितले. तसेच

९० दिवसांचे प्रमाणपत्र देण्यासंदर्भात तज्ञ समितीने निर्णय घ्यावा असे सुचविले. श्री. डोंगरे यांनी बांधकाम कामगारांना ९० दिवसांचे प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत असल्यामुळे नोंदीत कामगार संघटनांना असे अधिकार द्यावेत व कामगार विभागाच्या अधिका-यांनी नोंदणीचे अर्ज तपासून नोंदणी करावी असे सुचविले. मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी विधी व न्याय विभागाचा यास आक्षेप असल्याचे सांगितले. याबाबतीत श्री. डोंगरे यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असल्याचे सांगितले व तसे अधिकार संघटनेस देता येतील असे प्रतिपादन केले.

श्री. गुरव, सह सचिव यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाने ज्या राज्यांनी नियम केलेले नाहीत त्या राज्यांनी दिल्ली मंडळाच्या नियमांचा मॉडेल म्हणून आधार घ्यावा असे सुचविल्याचे सांगितले. परंतु महाराष्ट्र राज्याने सन २००७ मध्ये नियम केलेले असल्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश महाराष्ट्रास लागू होणार नाहीत. बांधकाम कामगाराचें मालक सतत बदलत असल्यामुळे सध्याचा मालक (Present Employer) ही जी तरतूद आहे तिच्याऐवजी फक्त मालक (Employer) हे शब्द ठेवल्यास कामगारांना मालकाचे प्रमाणपत्र मिळण्यास ज्या अडचणी येतात त्या कमी होतील असे सांगितले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, कायद्यात बदल करण्याचा प्रश्न राज्यसभेच्या Standing Committee कडे विचारार्थ आहे. मा.राज्यमंत्री यांनी ९० दिवसांची अट काढता येईल का ? अशी विचारणी केली असता, श्री. गुरव, सह सचिव, विधी व न्याय विभाग यांनी अशी अट काढता येणार नाही असे स्पष्ट केले. मा.अध्यक्ष यांनी राज्यसभेच्या निर्णयाची वाट पहावी असे सुचविले. मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी नियमामध्ये सरकारी कामगार अधिका-याने सुचविलेले प्रमाणपत्र असा बदल करता येईल असे सुचविले. श्री. गुरव यांनी गुजरातमध्ये जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, कामगार विभागाचे निरीक्षक व कारखाने निरीक्षक यांना असे अधिकार दिल्याचे सांगितले. मा.अध्यक्षांनी असे अधिकार संघटनेस देता येणार नाहीत हे स्पष्ट करुन सरकारी अधिकारी जबाबदार असल्याकारणाने त्यांना असे अधिकार देता येतील.

श्री. दळवी यांनी गुजरातप्रमाणे सरकारी अधिका-यांनां जबाबदार धरता येवू शकत असल्यामुळे त्यांनाच ही जबाबदारी देण्यात यावी असे मत व्यक्त केले. श्री. ढवळे यांनी याबाबतीत विधी व न्याय विभागाने लवकर निर्णय घ्यावा अशी सूचना केली.

मा.कामगार आयुक्त यांनी उप समित्या नेमण्याबाबतचा विषय समितीपुढे ठेवला असता मा.अध्यक्षांनी अशा समित्या जिल्हास्तरावर नेमता येतील असे सुचविले. श्री.गुरव यांनी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे मंडळास अशा समित्या नेमून त्यांना काही अधिकार प्रदान करु शकतील असे मत व्यक्त केले. मा.कामगार आयुक्त यांनी अशा समित्या नेमल्यास मंडळाला काही अधिकार राहणार नाहीत असे प्रतिपादन केले. श्री.गुरव, विधी व न्याय विभाग यांनी मंडळास अशा समित्या नेमता येत असल्यामुळे अधिनियमाच्या नियमात बदल करण्याची गरज नाही असे सांगितले. मा.अध्यक्ष यांनी जिल्हानिहाय समित्या नेमाव्यात व त्यांना कोणतेही अधिकार असणार नाहीत असे सुचविले. श्री. गुरव यांनी कायद्यात अशी तरतूद नसल्याचे स्पष्ट केले. मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी जिल्हानिहाय सल्लागार समित्या समन्वयासाठी नेमता येतील, त्यांना कुठलेही अधिकार असणार नाहीत असे सुचविले. श्री. गुरव यांनी तसे नियम बनवून विधी व न्याय विभागाकडे तपासणीसाठी पाठवावेत असे सुचविले. श्री.डोंगरे यांनी नोंदीत नसलेल्या कामगाराचा अपघात झाल्यास इस्पितळातील कालावधीदरम्यान निर्वाह भत्ता देण्यात यावा असे सुचविले. मा.कामगार आयुक्त यांनी कायद्याप्रमाणे फक्त नोंदीत कामगारालाच फायदा देता येतो असे स्पष्ट केले. मा.राज्यमंत्री यांनी अपघाताच्या पोलीस रिपोर्टवरुन असा फायदा देता येईल का असा प्रश्न विचारला असता, श्री. गुरव, विधी व न्याय विभाग यांनी असा फायदा फक्त नोंदीत कामगारालाच देता येतो असे स्पष्ट केले. नोंदीत नसलेल्या कामगारास अपघात नुकसान भरपाई अधिनियमाप्रमाणे फायदे मिळतात हेही स्पष्ट केले.

मा.अध्यक्ष यांनी रोजगार हमीवर नोंदणी होत नसल्याचे सांगितले असता श्री.डोंगरे यांनी शासनाने मनरेगाबाबतचा शासन निर्णय पारित करुन जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली ज्या समित्या गठीत केल्या आहेत, त्यात मंडळ सदस्यांचा समावेश करण्यात यावा. मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी रोजगार हमीवरील कामगारांच्या नोंदणीचा प्रश्न जिल्हा सल्लागार समित्या नेमण्यात येणार आहेत त्यामध्ये घेता येईल असे सांगितले. मनरेगा कामगारांना मंडळाकडे नोंदीत झाल्यावर मंडळाच्या कल्याणकारी योजनांचे फायदे मिळतात ही बाब मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी स्पष्ट केली. मा.राज्यमंत्री (कामगार) यांनी विटभट्टी, वाळू, दगडखाण कामगारांना नोंदीत

करण्याचा प्रस्ताव पाठवावा असे सुचविले असता मा.कामगार आयुक्त यांनी असा प्रस्ताव पाठविल्याचे सांगितले.

श्री. डोंगरे यांनी मंडळासाठी जी ५६ पदे मंजूर झालेली आहेत ती भरण्याबाबत सुचविले. मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी सामान्य प्रशासन विभागाने रिक्त पदापैकी फक्त ३% पदे भरण्याचे आदेश दिलले असून त्यापेक्षा जास्त पदे भरावयाची असल्यास कारणमीमांसेसह सामान्य प्रशासन विभागाची परवानगी घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे मंडळावरील मंजूर पदे ही प्रतिनियुक्तीने भरावीत असे स्पष्ट केले.

मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी यापुढे नवीन योजना आखण्याऐवजी सध्या मंडळाच्या ज्या योजना आहेत त्या जास्तीत जास्त कामगारांपर्यंत पोहोचवून त्यांच्या अंमलबजावणीवर लक्ष केंद्रीत करावे असे स्पष्ट केले. जनश्री विमा योजनेचे फायदे अत्यल्प प्रमाणात कामगारांपर्यंत पोहोचल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे जनश्री विमा योजना पुन्हा लागू करण्यात येवू नये असे स्पष्ट केले.

मा.कामगार आयुक्त यांनी तज्ञ समितीच्या सदस्यांच्या भत्त्याबाबतचा विषय सभासदांसमोर मांडला व याबाबत असलेल्या शासन आदेशाप्रमाणे भत्ते देता येतील असे सांगितले. श्री. गुरव यांनी त्याप्रमाणे नियम प्रस्तावित करावेत असे सुचविले. तज्ञ समितीच्या सदस्यांना ओळखपत्र देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाची मान्यता आवश्यक असल्याचे सांगितले. मा.अध्यक्ष यांनी तसा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावा असे सांगितले. श्री. डोंगरे यांनी मंडळाच्या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी कालावधी निश्चित करावा अशी सूचना केली. मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी मंडळ नवीन असल्यामुळे सध्या असा कालावधी निश्चित करणे उचित होणार नाही. मंडळास यासाठी अधिक कालावधी द्यावा व त्यानंतर यावर विचार करता येईल असे सुचविले. मा.कामगार आयुक्त यांनी टास्कफोर्स नेमण्याबाबतचा विषय सदस्यांपुढे मांडून असे विशद केले की, असा टास्कफोर्स दिल्ली राज्यात कार्यरत आहे. दिल्ली राज्य हे एका शहरापुरते मर्यादित असून महाराष्ट्र राज्याची व्याप्ती फारच मोठी असल्याने याबाबतीत असा टास्कफोर्स कसा नेमता येईल याबाबत विचार व्हावा. मा.सह सचिव (कामगार) यांनी हे काम जिल्हा सल्लागार समितीकडे सोपवावे असे सुचविले. मा.अध्यक्ष यांनी ही समिती उपकर भरला जातो की

नाही याचा देखील आढावा घेवू शकेल असे सुचविले. मा.कामगार आयुक्त यांनी उपकरासाठी इंजिनिअर्सची नेमणूक करण्याच्या प्रस्तावाचा विषय सभासदांसमोर मांडला असता, मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी याबाबतीत कायद्याखाली जे निरीक्षक आहेत त्यांनाच हे काम द्यावे असे सुचविले. मंडळ सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर सध्या असलेले मंडळ सदस्य नवीन सदस्य नेमण्यापर्यंत कार्यरत राहतील असा नियम करण्याबाबत श्री. डोंगरे यांनी सूचना केली. श्री. गुरव, विधी व न्याय विभाग यांनी मंडळ हे कायम असून नवीन सदस्यांची नेमणूक होईपर्यंत सध्या असलेले सदस्य कार्यरत राहतात असे सांगितले. मंडळाच्या कर्मचा-यांच्याबाबतीत नियम करण्याचा विषय मा.कामगार आयुक्त यांनी मांडून मंडळाच्या कर्मचा-यांना MCSR लागू करता येतील असे सुचविले. श्री. डोंगरे यांनी मंडळाचा नोंदणीच्या अर्जाचा नमुना बदलावा जेणेकरुन अर्जदार व त्याच्या कुटूंबासंबंधीची माहिती मंडळाला उपलब्ध होवू शकेल असे सांगितले. श्री. डोंगरे यांनी उपकर हा डी.डी.ऐवजी आर.टी.जी.एस.ने घ्यावा असे सुचविले असता श्री. गुरव यांनी सेस ॲक्टमध्ये डी.डी.द्वारेच रक्कम स्वीकारायचे बंधन असल्यामुळे व सदर कायद्यात व त्याखालील नियमात फक्त केंद्र शासनासच अधिकार असल्याचे स्पष्ट केले. श्री.ढवळे यांनी बांधकाम कामगारासाठीच्या ॲकॅडमीचा विषय सभासदांसमोर मांडला. त्यास मा.अध्यक्ष यांनी जिल्हाधिका-यांकडे शासकीय जागा मागण्यात आली असल्याचे सांगितले. मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी दरम्यान याबाबतीत डी.पी.आर. करावा असे सुचविले. मा.अध्यक्ष यांनी दिवाळी भेट देता येईल का याबाबत विचारणा केली असता मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी मच्छरदाणीचे वाटप करता येईल असे सुचविले. मा.अध्यक्ष यांनी ब्लँकेट, शुज टिफीन इ.बाबींचा विचार करावा असे सुचविले. यासाठी टेंडर काढावे लागेल व हे वाटप अधिका-यामार्फत करावे लागेल असे मत व्यक्त केले. याबाबतीत मंडळस्तरावर निर्णय घ्यावा असे मत त्यांनी व्यक्त केले.

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

*******